MHGA040003952021

# न्यायालय विद्यमान न्यायदंडाधिकारी (प्रथम श्रेणी ) आरमोरी, जिल्हा — गडचिरोली

## संक्षिप्त फौजदारी मामला क्र.१८४/२०२१

**CNR-MHGA04-000395-2021**

कु. सायली संतोष मनगंटीवार .... **अर्जदार**
वय— २१ वर्षे, धंदा — घरकाम,
राह. सर्वोदय वार्ड, गडचिरोली,
तहसील : व जिल्हा : गडचिरोली.

— वि रु द्ध —

पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, आरमोरी,
तालुका — आरमोरी, जिल्हा — गडचिरोली .... **गैरअर्जदार**

...................................................................

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ अंतर्गत अर्ज**

...................................................................

अर्जदारतर्फे विद्वान अधिवक्ता श्री. ए.एम. कानकाटे,
गैरअर्जदारतर्फे विद्वान सहा.सरकारी अधिवक्ता श्री.एस.डी. हटकर

........................................................................................................................

## निशाणी क.९ खालील आदेश

अर्जदार कु. सायली संतोष मनगंटीवार यांनी प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४५१ अन्वये प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजे दुचाकी टि.व्ही.एस. ज्युपीटर कंपनीची चेसीस क्र. MD626EG54L1H09238 इंजिन क्र.GG5HL1409258 ही परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, त्यांचे वर नमूद वाहन हे आरमोरी पोलीसांनी अप.क्र—१८४/२०१९ मध्ये जप्त केलेले आहे. अर्जदाराने सदर वाहन त्यांना दैनंदीन वापराकरीता परत मिळावे म्हणून विनंती केलेली आहे. सदर वाहनाची अर्जदार ही मालक आहे.

३. सरकारपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी सदर वाहन सोडण्यास हरकत घेतलेली आहे. सरकारी अभियोक्ता असे म्हणणे आहे की, सदर वाहन हे दारुची वाहतुक करतांना मिळून आले आहे. सदर वाहन अर्जदारास दिल्यास पुन्हा सदर वाहनाने दारुची वाहतुक करण्याची शक्यता आहे. अर्जास हरकत घेवुन वाहन अर्जदारास परत करु नये असे कथन केले.

४. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांनी वाहनाचे खरेदी बिलाची प्रत नि.क्र.११/१, आधारकार्ड प्रत नि.क्र.११/२ व आरोपीतर्फे वाहन अर्जदारास देण्यास हरकत नसल्याची पुरसीस नि.क्र.१५ येथे दाखल केले आहे.

५. सदर कामी नि.क्र.११/१ येथे दाखल केलेल्या वाहनाच्या खरेदी बीलाच्या प्रतीचे अवलोकन केले असता सायली एस. मनगंटीवार यांची नोंद असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणाचा निकाल लागण्यास काही कालावधी जाणार आहे. सदर प्रकरणामध्ये असे दिसून येते की, गुन्हा घडल्याच्या अनुशंगाने जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा अर्जदार याचा आहे. मुद्देमालाचा ताबा अधिकार हा सकृतदर्शनी सदर अर्जदार याचा आहे असे दिसून येते. सदर प्रकरणातील मुद्देमालाचा विचार करता सदर मुद्देमाल हा एक प्रकारचे वाहन आहे. त्याच्यावर हवामानाचा परिणाम होणार आहे. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडून राहील्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर जप्त मुदद्देमाल अर्जदार यांच्या ताब्यात देणे योग्य होईल. वरिल कारणांचा विचार करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच दुचाकी टि.व्ही.एस. ज्युपीटर कंपनीची चेसीस क्र.MD626EG54L1H09238 इंजिन क्र.GG5HL1409258 ही सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यत अर्जदार यांना खालील अटी व शर्तीवर परत करण्यात येतो—

३. अ) अर्जदार यांनी न्यायालयाने आदेश दिल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणे बाबत रक्कम रु.९०,०००/— (अक्षरी नव्वद हजार लाख मात्र) चे बंधपत्र दयावे.

ब) अर्जदार यांनी जप्त मुद्देमालात कोणत्याही प्रकारे बदल करू नये अथवा विल्हेवाट लावू नये, तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे तबदील करु नये.

क) अर्जदार यांनी सदर वाहन तपासी अधिकारी व न्यायालयाने मागणी केली असता सादर करावे.

ड) तपासी अंमलदार यांनी जप्त मुद्देमालाचे छायाचित्रे काढून अर्जदारासमोर पंचनामा करून सदर कागदपत्रे पंधरा दिवसात न्यायालयात दाखल करावीत.

इ) अर्जदार याने सदर वाहन वापरुन पुढे कोणताही गुन्हा करु नये. अथवा कोणताही गुन्हा करण्यास सदर वाहन कोणालाही देउ नये.

स्वा/—
**( आर.ए.सावंत )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
आरमोरी.

आरमोरी.
दिनांक : २८/१०/२०२१.